# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना :-** नागपूर शहराचे विविध दहनघाटावर शवदहन करण्याकरीता
**{घनकचरा व्यवस्थापन विभाग}** गोवरी, जलाऊ लाकुड, बायोकोल ब्रिकेट इत्यादी सुविधा मनपा द्वारे पुरविण्यात येते. ही सर्व सुविधा उपलब्ध करुन देण्याकरीता दहनघाट मनपा अंतर्गत समाविष्ठ करण्यात येते.

चिचभवन दहनघाटावर प्रकल्प विभाग, मनपाद्वारे घाटाचे स्थापत्य विषयक स्वरुपाचे विकासात्मक कामे पुर्ण झालयाचे तसेच घाट सुरु करण्याकरीता इतर सुविधा उपलब्ध करुन देण्याकरीता संबंधीत विभागाला कळविण्यात आले असता तसेच जयताळा दहनघाट सुध्दा सुरु करावयाचे असल्याने दोन्ही दहनघाट अधिकृत करुन मनपा दहनघाटावर पुरविण्यात येणाऱ्या सर्व सेवा व दहनक्रियेकरीता इतर सुविधा उपलब्ध करुन देण्याचा प्रश्न विचारात घेण्यास्तव सादर.

टिप :- सविस्तर माहिती नस्ती मध्ये उपलब्ध आहे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 931/स्थायी समिती/प्रशासक** **दिनांक :- 26/07/2024**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार उपायुक्त तथा संचालक, घनकचरा व्यवस्थापन विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर शहराचे विविध दहनघाटावर शवदहन करण्याकरीता गोवरी, जलाऊ लाकुड, बायोकोल ब्रिकेट इत्यादी सुविधा मनपा द्वारे पुरविण्यात येते. ही सर्व सुविधा उपलब्ध करुन देण्याकरीता दहनघाट मनपा अंतर्गत समाविष्ठ करण्यात येते.

चिचभवन दहनघाटावर प्रकल्प विभाग, मनपाद्वारे घाटाचे स्थापत्य विषयक स्वरुपाचे विकासात्मक कामे पुर्ण झालयाचे तसेच घाट सुरु करण्याकरीता इतर सुविधा उपलब्ध करुन देण्याकरीता संबंधीत विभागाला कळविण्यात आले असता तसेच जयताळा दहनघाट सुध्दा सुरु करावयाचे असल्याने दोन्ही दहनघाट अधिकृत करुन मनपा दहनघाटावर पुरविण्यात येणाऱ्या सर्व सेवा व दहनक्रियेकरीता इतर सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.